e-ISJN: A4372-3088
p-ISJN: A4372-3089

ISSN: 2394-3122 (Online)
ISSN: 2394-6253 (Print)
Impact Factor: 6.03

Volume 11, Issue 12, December 2024

SK International Journal of Multidisciplinary Research Hub

Journal for all Subjects

Research Article / Survey Paper / Case Study

Published By: SK Publisher

(www.skpublisher.com)

*A Monthly Double-Blind Peer Reviewed Refereed Open Access Multidisciplinary & Multilingual International Journal*

Special Issue: National Interdisciplinary Conference on "Women Empowerment: Issues, Challenges and Solutions"

Organised by: Department of Political Science & I. Q. A. C., Shankarlal Khandelwal Arts, Science & Commerce College, Akola, Maharashtra 444002.

(Sponsored by PM-UShA Grants to Strengthen Colleges)

# ग्रामीण महिलांच्या सक्षमीकरणातील समस्या व उपायोजना

**डॉ. सागर चं. वानखडे**[१]
सीताबाई कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला

**प्रा. विजय स. चांदणे**[२]
सीताबाई कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला

**DOI:** https://doi.org/10.61165/sk.publisher.v11i12.103

*सारांश : जिच्या हाती पाळण्याची दोरी ती जगाची उद्धारी अशा शब्दात राष्ट्रसंत तुकडोजी  महाराज यांनी ग्रामगीते स्त्रीची महती गायली आहे . आज स्त्री  देशाची राष्ट्रपती, पंतप्रधान, सभापती, वैज्ञानिक,डॉक्टर आहे. महिलांनी प्रत्येक क्षेत्रामध्ये स्वतःचे अस्तित्व निर्माण  आहे .पण आजही पुरुषसत्ताक समाजात तिचे स्थान दुय्यम आहे. त्यामुळे महिलांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते . त्यामध्ये शहरे भागापेक्षा ग्रामीण भागातील महिलांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. शिक्षण, आरोग्य,आर्थिक,लैंगिक अत्याचार,कौटुंबिक हिसांचार अशा अनेक समस्यांना सामोरे जावे लागते.*

*प्रस्तुत संशोधन पत्रिकेचा उद्देश ग्रामीण भागातील महिलांच्या विविध समस्यांचा अभ्यास करून त्यावर उपाय सांगण्याचा प्रयत्न केले आहे .*

**प्रस्तावना :-**

कोणतेही समाजाची वास्तविक परिस्थिती जाणून घ्यायची ठरल्यास महत्वाचे माध्यम म्हणजे त्या समाजातील महिला व विशेष करून ग्रामीण महिलांची परिस्थिती काय आहे हे जाणून घेणे. त्यांना कोणते अधिकार आहेत? त्यांच्या जीवनातील अनेक मूलभूत समस्यांचा आढावा घेणे क्रम प्राप्त ठरते. ग्रामीण भागाचा अभ्यास करताना कुटुंबाचा प्रमुख पुरुष असतो. कुटुंबातील महत्त्वपूर्ण निर्णय पुरुष घेत असतो. कुटुंबाचा स्त्रीचे स्थान नगण्य असते. स्त्री दुर्लक्षित घटक म्हणून बघितले जाते. म्हणून विविध स्वरूपांच्या समस्यांना महिलांना तोंड द्यावे लागते .

जागतिक महासत्तेचे स्वप्न उराशी बाळगणाऱ्या या भारत देशाला जर विकसनशील देशाच्या रांगेत आपले भक्कम स्थान निर्माण करायचे असेल तर आपल्याला पुरुषांच्या बरोबर स्त्रियांचा ही  विकास सर्वांगाने करणे गरजेचे आहे .सरकारने 2001 हे महिला सशक्तिकरण वर्ष  जाहीर केले आहे .या महिला सशक्तीकरणासाठी अनेक योजना शासनाने राबविलेल्या आहे. परंतु त्याची पाहिजे तशी अंमलबजावणी व विकास होताना दिसत नाही.

*© 2024, SK Publisher All Rights Reserved* 

आजही ग्रामीण डोंगरी आदिवासी भागात स्त्रियाला गौण स्थान आहे व अजूनही चूल व मुल एवढे स्थान आहे .तिला शिक्षणातून सामाजिक, आर्थिक जबाबदारी पासून अलिप्त ठेवले जाते . ग्रामीण भागातील स्त्री पुरुषाच्या बरोबरीचे काम करते पण तिला कामाचा मोबदला कमी मिळतो. तिने मिळवलेल्या पैशावर तिचा अधिकार नसतो. घरातील सर्वांची नवरा, सासू, सासरे, मुले यांची जबाबदारी पार पाडावी लागते. या सर्वांमध्ये तिचे मानसिक खच्चीकरण होते .तरी पण ती आपल्या संसारासाठी हे सर्व जबाबदाऱ्या पार पाडत असते. हे सर्व करीत असताना तिला अनेक समस्या येतात पण या समस्या कडे कोणाचेच लक्ष नसते .

**ग्रामीण महिलांच्या समस्या :-**

**कौटुंबिक समस्या :-**

संयुक्त कुटुंब असो की विभक्त कुटुंब केंद्रस्थानी पुरुष असतो .त्या कुटुंबामधील महत्त्वाच्या सर्व निर्णय पुरुष घेत असतो. कुटुंबातील मुलीला लग्न झाल्यानंतर पतीच्या घरी जावे लागते .म्हणजेच कुटुंब व्यवस्थेमध्ये स्त्रीला नगण्य स्थान आहे. वंशाला मुलगाच हवा हा दृष्टिकोनामुळे महिला वर सतत अन्याय झालेला असतो.

**बालविवाह :-**

अनेक थोर पुरुषांनी बालविवाह प्रथेला आळा घातला त्यासंबंधी कायदे केले परंतु त्यांचे समूळ उच्चाटन अजूनही आपल्या देशातून झालेले नाही .राजस्थान ,उत्तर प्रदेश ,महाराष्ट्र 'व मध्य प्रदेशातील आदिवासी भागात अजूनही बालविवाहाच्या घटना उजेडात येतात .अशा कमी वयात मुलींचे लग्न करून त्यांच्यावर मातृत्वाची जबाबदारी लादली जाते .त्यामुळे त्या मुली अनेक आजारांना बळी पडतात .याशिवाय अनेक समस्यांना ग्रामीण भागातील महिलांना सामोरे जावे लागते .

**शैक्षणिक समस्या :-**

ग्रामीण भागातील महिला प्राथमिक शिक्षण कसेबसे पूर्ण करतात पण ग्रामीण भागात सुविधांचा अभाव असल्यामुळे पुढे शिक्षणाच्या अडचणी निर्माण होतात. घरामध्ये पुरुषांचे वर्चस्व असल्यामुळे मुलांच्या शिक्षणाकडे जास्त लक्ष दिले जाते .उच्च शिक्षणासाठी मुलींपेक्षा जास्त खर्च मुलावर केला जातो .ग्रामीण भागातील मुली 10 ते 12 वी पर्यंत शिक्षण कसेबसे पूर्ण करतात .पण वाहनांचा अभाव, अशिक्षित आई-वडील, समाजाचा मुलींकडे बघण्याचा दृष्टिकोन यामुळे ग्रामीण महिला व मुली यांना अर्धवट शिक्षण सोडावे लागते.

**मानसिक समस्या :-**

शारीरिक, कौटुंबिक, सामाजिक या समस्या सोबतच महिलांना भोगावे लागणारे गंभीर समस्या म्हणजे मानसिक समस्या की ज्यातून त्याचे पूर्णत: आयुष्य उध्वस्त होतो .लैंगिक अत्याचारला महिला बळी पडलेल्या महिला व मुली यांचे मानसिक संतुलन बिघडते त्या आयुष्यात पुन्हा कधीच उभ्या राहू शकत नाही. कुटुंबात होणारी मारहाण, नवऱ्याची व्यसनाधीनता, लैंगिक छळ, पुरुषांचे परस्त्रीशी असलेले लैंगिक संबंध याचाही महिलांच्या मानसिकतेवर परिणाम होतो.

© 2024, SK Publisher All Rights Reserved

SK International Journal of Multidisciplinary Research Hub
Volume 11, Issue 12, December 2024 pg. 529-532

**आर्थिक समस्या : -**

ग्रामीण भागात पुरुषांपेक्षा स्त्रिया जास्त काम करतात . पण वेतनामध्ये तफावत दिसते .पुरुषांपेक्षा स्त्रियांना रोजगार कमी मिळतो . घरकाम करून शेती व शेतीपूरक व्यवसाय करून मिळालेला मोबदला स्वतःवर खर्च करू शकत नाही .

**हुंडा पद्धत :-**

भारतामध्ये पूर्वापार हुंडा पद्धत अस्तित्वात आहे . भारतातील प्रत्येक प्रांतात जातीत अगदी धर्मात सुद्धा आज देखील ही प्रथा मूळ धरून आहे .या प्रथेचे रूपांतर वैवाहिक जीवनामध्ये एक भयंकर समस्येत रूपांतर झाले आहे .या समस्येला प्रामुख्याने महिला बळी पडतात .

ग्रामीण महिलांच्या समस्यांवर उपाययोजना :-

१) महिला संघटनांची स्थापना करून शक्तीद्वारे पीडित महिलांना मदत केले पाहिजे .

२) स्त्री ही उपभोगाची वस्तू आहे हा गैरसमज समाजातून घालवण्यासाठी जाणीव जागृती केले पाहिजे .

३) कौटुंबिक हिंसाचारातून महिलांचे संरक्षण अधिनियम 2001हा कायदा 26 ऑक्टोबर 2006 पासून लागू करण्यात आला .

४) हुंडा पद्धतीविषयी पुरुषांची मासिकता बदलणे आवश्यक आहे .

५) बालविवाह प्रतिबंधक कायदा , दारू मुक्ती , या संबंधीचे कायदे कडक करून याची काटेकोर अंमलबजावणीचे प्रयत्न केले पाहिजे .

६) कौटुंबिक व सामाजिक हिंसाराच्या घटनांना आळा घालण्यासाठी केवळ कायदे करून चालणार नाही तर त्यांची व्याप्ती वाढवून अंमलबजावणी काटेकोरपणे करणे गरजेचे आहे .

७) शाळांमध्ये , सामाजिक ठिकाणी महिलांचा आदर वाढवण्यासाठी उपक्रम हाती घेतले पाहिजे .

**निष्कर्ष :-**

महिलांना समानतेची वागणूक ,घरामध्ये योग्य वागणूक ,शैक्षणिक ,आरोग्य यांच्या सुविधांचा लाभ देणे , आर्थिक स्वावलंब मिळवून दिल्यास अधिक समस्या सुटू शकतात .

संदर्भ ग्रंथ

१) प्रा. अशोक गोरे , भारतीय सामाजिक समस्या , विद्या बुक्स , औरंगाबाद जून २०००

२) संजीवनी खरे , बालिका वधू

३) रानडे प्रतिभा , स्त्री प्रश्नांची चर्चा , पॉप्युलर प्रकाशन , मुंबई १९९१

४) गोरे अशोक , भारतीय सामाजिक समस्या , विद्या बुक्स , मुंबई , जून 2000

© 2024, SK Publisher All Rights Reserved

५) खडसे भा . कि . ,भारतीय समाज आणि सामाजिक समस्या , हिमालय पब्लिकेशन हाऊस , मुंबई , 2004

६) डॉ .दा .धो . काचोळे , के .एस . अत्तकरे , ग्रामीण नागरी प्रश्न आणि समस्या , कैलास पब्लिकेशन, गोकुळवाडी , औरंगपुरा , औरंगाबाद .

:::. Cite this article .:::

वानखडे, डॉ. सागर चं., & चांदणेप्रा. विजय स. (2024). ग्रामीण महिलांच्या सक्षमीकरणातील समस्या व उपायोजना. SK International Journal of Multidisciplinary Research Hub, 11(12), 529–532.

https://doi.org/10.61165/sk.publisher.v11i12.103